## वसंत फुलला







**नामपूर, जि. नाशिक : बागलाण तालुक्याच्या पश्चिमेकडील आदिवासी भागात तसेच पूर्वेकडील काटवन खोऱ्यात ऐन उन्हाळ्यात विविध रंगांनी फुललेल्या आकर्षक पुष्पांनी खोरे नटले आहे. वसंत ऋतू चैतन्याची लहर म्हणून ओळखला जातो. झाडांना सौंदर्याचा नवा साज परिधान करायला मिळणार असल्याने फुलझाडांना जणू वसंत ऋतूचे डोहाळे लागलेले असतात. काटवन खोऱ्यातील जंगलात मोठ्या प्रमाणात पळस, गुलमोहर, बहावा, नीलमोहोर, अशोक, तामण, चाफा, मोह आदी विविध फुलांची झाडे बहरलेली पाहायला मिळत आहेत.** (छायाचित्रे : प्रशांत बैरागी)

# ‘वनामकृविचा कुलगुरू मराठी भाषिक असावा’

**परभणी (प्रतिनिधी) :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मराठी भाषिक तसेच मराठवाडा विभागातील शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नांच्या जाणकार व्यक्तीची निवड करावी, अशी मागणी विभागातील शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी संघटना यांच्याकडून केली जात आहे.

वसंतराव मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांचा कार्यकाळ ३१ मे रोजी संपत आहे. नवीन कुलगुरू निवडीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्रीमती मंजुळा चेल्लूर या अध्यक्ष असलेल्या शोध समितीने कुलगुरू पदासाठी विहित मुदतीत नामनिर्देशपत्रे सादर केलेल्यापैकी आवश्यक अर्हता, अपेक्षित अनुभव, इच्छित कौशल्य आणि क्षमता असलेल्या १५ उमेदवारांना शनिवारी (ता. १९) मुंबई येथे मुलाखतीसाठी बोलावले होते; परंतु १२ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. त्यापैकी डॉ. किरण कोकाटे, डॉ. अशोक ढवण, डॉ. उत्तम महाडकर, डॉ. चिखले हे चार उमेदवार मराठी भाषिक आहेत. अन्य ८ जण अमराठी भाषिक उमेदवार आहेत. मुलाखतीनंतर राज्यपालांपुढे सादरीकरण करण्यासाठी अंतिम पाच उमेदवारांची शिफारस करण्यात आली. त्यामुळे लवकरच नवीन कुलगुरू निवडीची प्रक्रिया पूर्ण होईल. कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू हे निवृत्त होण्याच्या आत नवीन कुलगुरूंची निवड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुपदी आयसीएआर किंवा अन्य संशोधन संस्थातील अमराठी भाषिक शास्त्रज्ञ, निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या व्यक्तींची नियुक्ती केली जात आहे. यामुळे मराठी भाषिक पात्र उमेदवारांवर अन्याय होत आहे. अमराठी भाषिक कुलगुरूंना भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न, पीकपद्धती, अर्थकारण, प्रशासकीय कामकाज समजून घ्यायला मोठा कालावधी लागतो. शेतकरी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी अडचणी येतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या शास्त्रज्ञांना प्रशासकीय कामांचा फारसा अनुभव नसतो. मराठवाडा विभागात कोरडवाहू क्षेत्र बहुल आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी कुलगुरू पदावर विराजमान होणारी व्यक्ती मराठी भाषिक, प्रश्नांची जाणकार असावी. त्या अनुषंगाने राज्यातील कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आदी ठिकाणी संचालक, तसेच अन्य महत्त्वांच्या पदावर राहिलेल्या अनुभवी व्यक्तींची कुलगुरुपदी निवड करणे आवश्यक आहे.

मागच्या वेळी राज्यपालांपुढे सादरीकरणासाठी शिफारस करण्यात आलेल्या पाच उमेदवारांमध्ये एकही मराठी भाषिक उमेदवार नव्हता. त्या वेळी शेजारच्या तेलंगणा राज्यातील डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांची कुलगुरुपदी निवड करण्यात आली. डॉ. व्यंकटेश्वरलू हिन्दी भाषेत उत्तमरीत्या संवाद साधतात. त्यांना मराठी चांगल्याप्रकारे वाचता येते. त्यामुळे त्यांना या भागातील समस्या जाणून घेण्यासाठी फारशा अडचणी आल्या नाहीत. परंतु अन्य राज्यातील अमराठीभाषिक कुलगुरूमुळे संवादसह अनेक बाबतीत अडचणी येतात. त्यामुळे नवीन कुलगुरू निवडतांना मराठी भाषिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी शेतकरी, प्राध्यापक, कर्चमारी संघटनांनी केली आहे.

### मुख्यमंत्र्यांकडे मागणी

गेल्या काही वर्षांपासून अमराठी भाषिक व्यक्तींची महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरू पदावर वर्णी लावली जात आहे. मराठी भाषेचा गंध नसलेले कुलगुरू लादल्याने शेती आणि शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मराठी भाषिक व्यक्तींची नियुक्ती करावी, अशी मागणी कृषी विद्यापीठ प्राध्यापक संघातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली.

# सिंचन विहिरी, फळबागांचा निधी थेट बँक खात्यात मिळणार : मंत्री रावल



**मुंबई, (प्रतिनिधी ):** मनरेगा योजनेतून शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचे बांधकाम तसेच फळबाग लागवड योजनेसाठी दिला जाणारा निधी हा आता डीबीटीद्वारे थेट लाभार्थी शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुर्वी सिंचन विहीरीसाठीच्या साहित्य खरेदीचा निधी हा दुकानदारास तर फळबाग लागवडीचा निधी हा नर्सरीला दिला जात होता. आता हा निधी शेतकऱ्यास मिळणार असल्याने त्याला योजनेचा थेट लाभ मिळू शकेल, अशी माहिती रोजगार हमी योजना मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्री श्री. रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत सलग दोन दिवस सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या मॅरॅथॉन बैठकीत मनरेगा, रोहयो, सिंचन विहिरी, फळबाग लागवड, समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना यांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. बैठकीस रोहयो सचिव एकनाथ डवले, रोहयो आयुक्त रंगा नाईक यांच्यासह विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत समग्र चर्चा करून त्यातून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने शेतकरी हिताचे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांची माहिती देताना मंत्री श्री. रावल म्हणाले, की रोहयो विभागामार्फत सिंचन विहिरींची योजना व्यापक प्रमाणात राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक लाभाची असलेली ही योजना क्रांतिकारी ठरली आहे. या योजनेतून राज्यभरात सध्या काम सुरू असलेल्या ७६ हजार विहिरींचे बांधकाम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन दोन दिवस चाललेल्या बैठकीमध्ये करण्यात आले.

या योजनेतील कुशल कामासाठीचा म्हणजे विहीर बांधकामासाठी लागणारे सिमेंट, वाळू, स्टील इत्यादी खरेदीचा निधी हा ग्रामपंचायतीमार्फत संबंधित व्यापारी तथा दुकानदारास दिला जात असे. पण आता हा निधी डीबीटीद्वारे (Direct benefit transfer) थेट शेतकऱ्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनरेगामधून शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक लाभाची कल्पवृक्ष फळबाग योजनाही राबविली जाते. यात मनरेगाच्या खर्चातून खासगी शेतात फळबाग लावली जाते. त्यातील उत्पन्नाचा लाभ संबंधित शेतकऱ्यास मिळतो. या योजनेसाठी खरेदी करावयाच्या रोपांचा निधी आतापर्यंत संबंधित नर्सरीला दिला जात असे. आता हा निधीही डीबीटीद्वारे (Direct benefit transfer) थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यास ही रोपे सरकारी किवा नोंदणीकृत खासगी नर्सरीतून खरेदी करता येतील.

### रेशीम उद्योगाचे क्लस्टर

राज्यात रेशीम उद्योगाला मोठा वाव आहे. त्यामुळे तुती लागवडीला चालना देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्यात रेशीम उद्योगाचे क्लस्टर निर्माण करण्याची इच्छा मंत्री श्री. रावल यांनी या वेळी व्यक्त केली. मनरेगा योजनेतून तुतीची लागवड ही फक्त पावसाळ्याच्या कालावधीत करावी, अशी अट सध्या आहे. पण आता ही अट रद्द करून वर्षभर कधीही तुती लागवडीस संमती देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. कल्पवृक्ष फळबाग योजनेसाठीही असलेली ही अट रद्द करून फळबागेची लागवडही पाण्याच्या उपलब्धतेनुसार वर्षभरात कधीही करण्यास संमती देण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती मंत्री श्री. रावल यांनी दिली.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित
ग्रामपंचायत हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे — प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

‘अॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

मंगळवार, २२ मे २०१८ रोजी

**विषय** – जमीन सुधारणा व ऊस व्यवस्थापन तंत्रज्ञान

**वक्ते** – **डॉ. आबासाहेब साळुंखे,** ऊसतज्ज्ञ

**स्थळ** – श्री विठ्ठल रुक्मिनी मंदिर, मु. पो. हिंगणीबेर्डी, ता. दौंड, जि. पुणे

**वेळ** – सायं. ६ वा.

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.